## सारणी क्रमांक ५.७

### मूल्यसंक्रमणासाठी अध्यापक करीत असलेले प्रयत्न

| अनु. | केले जाणारे प्रयत्न-प्रकार | अध्यापकांची संख्या |
|---|---|---|
| १. | उदाहरणांच्याद्वारे, दाखल्यांच्याद्वारे, दृष्टांत देऊन | १३ |
| २. | प्रश्नोत्तर पद्धतीद्वारे | ५ |
| ३. | चर्चेद्वारे | ४ |
| ४. | योग्य कथनाद्वारे, वक्तव्याद्वारे | ४ |
| ५. | संदर्भ देऊन | ३ |
| ६. | योग्य प्रस्तावनेद्वारे | ३ |
| ७. | प्रभावी वाचनाद्वारे | २ |
| ८. | स्पष्टीकरणाद्वारे, विवेचनाद्वारे | २ |
| ९. | शंका निरसनाद्वारे | १ |
| १०. | मूल्य निदर्शनास आणून देऊन | १ |
| ११. | अधिक माहिती देऊन | १ |
| १२. | काव्यमयतेला वास्तवतेचे रूप देऊन | १ |
| १३. | मार्मिक विश्लेषण | १ |
| १४. | पौराणिक व चरित्रकथांच्याद्वारे | १ |
| १५. | अभिनयाद्वारे | १ |
| १६. | वृत्तपत्रातील घडामोडींच्याद्वारे | १ |

वरील सारणी क्रमांक ५.७ वरून असे निदर्शनास येते की, अध्यापक पाठातील मूल्यांचे संक्रमण होण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्न करतात. मूल्य-संक्रमणाच्या दृष्टीने ही बाब आनंददायक व समाधानकारक आहे.

मूल्यसंक्रमणासाठी अध्यापक ` उदाहरणे, दाखले व दृष्टांत यांच्या द्वारे ` या प्रयत्नाचा सर्वात अधिक वापर करतात. त्या खालोखाल अनुक्रमे प्रश्नोत्तराद्वारे, चर्चेद्वारे, योग्य कथनाद्वारे किंवा वक्तव्याद्वारे, संदर्भ देऊन, योग्य प्रस्तावनेद्वारे, प्रभावी वाचनाद्वारे, स्पष्टीकरणाद्वारे किंवा विवेचना-द्वारे, शंका निरसनाद्वारे, मूल्यनिदर्शनास आणून देऊन, अधिक माहिती देऊन, काव्यमयतेला वास्तवतेचे रूप देऊन, मार्मिक विश्लेषणाद्वारे, पौराणिक व चरित्र कथांच्याद्वारे, अभिनयाद्वारे, वृत्तपत्रातील घडामोडीद्वारे या प्रयत्नांचा क्रम लागतो.

` अभिनय ` सोडल्यास कोणत्याही दृक्-श्राव्य साधनाचा वापर मूल्ये रुजविण्यासाठी केला जात नाही असेही निदर्शनास येते. मूल्ये ही केवळ बौद्धिक स्तरावरच रुजवावयाची नसून ती भावनिक स्तरावरही रुजवावयाची आहेत. त्या दृष्टीने मूल्यशिक्षणात दृक्-श्राव्य साधनांच्या वापरास वाव आहे.

### ५.८ मूल्यसंक्रमणासाठी प्रयत्न करीत नसल्याची कारणे :

प्रश्न क्रमांक १६ ला ` नाही ` असा प्रतिसाद दोन अध्यापकांनी दिलेला होता. अशांसाठी प्रश्न क्रमांक १८ ची (प्रयत्न करीत नसल्यास त्याची कोणती कारणे संभवतात ?) योजना केली होती. हा प्रश्न बंदिस्त व मुक्त अशा दोन्ही स्वरूपाचा होता. या प्रश्नाच्या बंदिस्त स्वरूपात ५ विधाने दिली होती आणि ज्या कारणाशी अध्यापक सहमत आहेत त्या कारणां-समोर संमतीदर्शक ( ✓ ) खूण करावयास सांगितली होती.

या प्रश्नामधून मिळालेली माहिती सारणी क्रमांक ५.८ मध्ये नमूद केली आहे.

सारणी क्रमांक ५.८

मूल्यसंक्रमणासाठी प्रयत्न करीत नसल्याची कारणे

| अनु. | मूल्यसंक्रमणासाठी प्रयत्न करीत नसल्याची कारणे | अध्यापकांची संख्या |
|---|---|---|
| अ) | मूल्ये ही मुद्दाम संक्रमित करावी लागत नाहीत ती आपोआप संक्रमित होतात. | - |
| ब) | मूल्याधारित प्रश्न परीक्षेत विचारले जात नसल्याने त्या दृष्टीने अध्यापन केले जात नाही. | २ |
| क) | मूल्यसंक्रमणावर भर दिल्यास अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही. | २ |
| ड) | पाठयपुस्तकातील पाठांचे अध्यापन करीत असताना त्यातील मूल्ये विद्यार्थ्यांत संक्रमित करणे हे शिक्षकांकडून अपेक्षित नाही. | - |
| इ) | मूल्यांचा दैनंदिन जीवनात उपयोग होत नाही. | - |

वरील सारणी क्रमांक ५.८ वरून असे दिसून येते की, मूल्याधारित प्रश्न परीक्षेत विचारले जात नसल्याने तसेच मूल्यसंक्रमणावर भर दिल्यास अभ्यासक्रम वेळेवर पूर्ण होत नसल्याने मूल्यसंक्रमणासाठी प्रयत्न न करणाऱ्या अध्यापकांची प्रत्येकी संख्या २ आहे. हा प्रतिसाद मूल्यसंक्रमणासाठी प्रयत्न न करणाऱ्या अध्यापकांच्या संख्येचा (२) विचार केला असता १०० टक्के आणि एकूण अध्यापकांचा (१५) विचार केला असता १३.३३ टक्के इतका आहे.

परीक्षेत मूल्याधारित प्रश्न विचारले जात नाहीत म्हणून त्या दृष्टीने अध्यापन केले जात नाही. तसेच मूल्यसंक्रमणावर भर दिल्यास अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही ही दोन्ही मते योग्य वाटत नाहीत.

शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ परीक्षा पास होणे हे नसून त्या-व्यतिरिक्त विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करणे हे मानले तर परीक्षेत मूल्याधारित प्रश्न विचारले जात नाहीत म्हणून मूल्यसंक्रमणासाठी प्रयत्न केला जात नाही हे म्हणणे तितकेसे संयुक्तिक वाटत नाही.

मूल्यसंक्रमण हे विषयाचे अध्यापन करीत असतानाच करावयाचे आहे. त्यामुळे मूल्यसंक्रमणावर भर दिल्यास अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही हेही म्हणणे योग्य वाटत नाही.

प्रश्नाच्या उत्तरार्धात या कारणांव्यतिरिक्त आणखी काही कारणे असल्यास ती नमूद करावयास सांगितली होती.

या दोन अध्यापकांनी वरील कारणांव्यतिरिक्त आणखी दोन कारणे नमूद केली. ती पुढीलप्रमाणे :

१) विद्यार्थी संख्या अधिक असल्याने आणि

२) वेळ अपुरा असल्याने मूल्यसंक्रमण करणे शक्य नाही.

यापैकी यशस्वीरीतीने मूल्यसंक्रमण करण्यासाठी वर्गातील विद्यार्थी संख्या मर्यादित असावी हा अभिप्राय मान्य करण्यासारखा असला तरी भारता-सारख्या देशातील लोकसंख्येचा प्रस्फोट लक्षात घेतला तर विद्यार्थ्यांची वर्गातील संख्या नेहमीच अधिक राहणार आहे म्हणून मूल्यसंक्रमणासाठी प्रयत्नच करायचा नाही हे म्हणणे सूज्ञ मनाला पटण्यासारखे नाही.

## ५.९ हस्तपुस्तिकेची आवश्यकता :

पाठात अंतर्भूत असलेली मूल्ये अध्यापनातून यावीत यासाठी अध्यापकांना हस्तपुस्तिकेची आवश्यकता आहे काय हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १९ ची (पाठात अंतर्भूत असलेली मूल्ये अध्यापनातून यावीत यासाठी शिक्षकांना हस्तपुस्तिकेची आवश्यकता आहे काय ?) योजना केली होती. या प्रश्नामधून मिळालेली माहिती सारणी क्र. ५.९ मध्ये नमूद केलेली आहे.

सारणी क्रमांक ५.९

हस्तपुस्तिकेची आवश्यकता

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| पाठात अंतर्भूत असलेली मूल्ये अध्यापनातून यावीत यासाठी हस्तपुस्तिकेची आवश्यकता | १२ | ३ | १५ |

वरील सारणी क्रमांक ५.९ वरून असे निदर्शनास येते की, १५ पैकी १२ म्हणजेच ८० टक्के अध्यापकांना हस्तपुस्तिकेची आवश्यकता आहे.

यावरून असे म्हणता येईल की, अध्यापनातून मूल्यसंवर्धन करावयाचे असेल तर अध्यापकांना हस्तपुस्तिकेची आवश्यकता आहे.

५.१० हस्तपुस्तिकेचे स्वरूप :

हस्तपुस्तिकेची आवश्यकता असल्यास तिचे सर्वसाधारण स्वरूप कसे असावे हे समजून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक २० ची (हस्तपुस्तिकेचे स्वरूप कसे असावे ?) योजना केली होती. या प्रश्नाला दिलेला प्रतिसाद अध्यापकांच्या शब्दांत पुढील प्रमाणे आहे :

१) हस्तपुस्तिकेत मूल्यांचे अचूक दिग्दर्शन व्हावे, मूल्ये समजण्यासाठी सोपी उदाहरणे द्यावीत, हस्तपुस्तिकेचे बाह्यस्वरूप लहान असावे.

२) पाठाच्या प्रास्ताविक भागात मूल्यांचे अचूक दिग्दर्शन व्हावे, मूल्यस्वरूप समजण्याकरता अनेक दाखले द्यावेत, हस्तपुस्तिकेचे बाह्यस्वरूप लहान असावे.

३) लेखकाविषयी माहिती हवी, त्याला ती जीवनमूल्ये महत्वाची का वाटली याचे स्पष्टीकरण हवे, साहित्य समाजाचे दर्पण असते. पाठात नमूद केलेली मूल्ये कुठेतरी जीवनात आलेली असतात. त्या दृष्टीने मार्गदर्शन व्हावे, पाठातील ठळक मूल्ये शिक्षकांना समजावीत.

४) मूल्यसंवर्धनाचे आव्हानात्मक स्वरूप ज्या वरून स्पष्ट होईल अशाप्रकारची हस्तपुस्तिका असावी. आजच्या परिस्थितीत मूल्यसंवर्धनाचे काम शिक्षकाला यशस्वीरीतीने कसे करता येईल याबाबत त्यात मार्गदर्शन असावे.

५) इयत्ता १० वीच्या अध्यापन पुस्तिकेसारखे ते असावे, पाठाची उद्दिष्टे, पाठाचा थोडक्यात सारांश, पाठावरील प्रश्न, कठिण शब्दांचा अर्थ असे हस्तपुस्तिकेचे स्वरूप असावे.

६) मूल्याधिष्ठित प्रश्नावली हस्तपुस्तिकेत असावी. लेखक वा कविविषयी अधिक माहिती त्यात असावी. कोणत्या विशिष्ट पार्श्वभूमीवर त्याने ते लेखन केले त्याचाही उल्लेख त्यात हवा. लेखकाला ती जीवनमूल्ये का महत्वाची वाटली हे जर समजले तर ते मुलांच्या मनावर ठसविता येईल.

७) हस्तपुस्तिकेत पाठातील मूल्ये निश्चित, स्पष्ट व बिनचूक असावीत तसेच ती अध्यापनातून बिंबविण्यासाठी मार्गदर्शनपर सूचना व अधिक माहिती असावी.

८) हस्तपुस्तिकेमध्ये सुरुवातीला त्या पाठामधील मूल्ये स्पष्ट केलेली असावीत. त्या मूल्यांशी जवळीक असणाऱ्या वाक्यांचा संदर्भ स्पष्ट केला जावा म्हणजे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडून मूल्ये बिंबली जातील.

९) पाठातील महत्वाचा आशय लेखक वा कवीचा संदेश, साहित्य-निर्मिती मागील लेखकाची प्रेरणा वा प्रसंग यांचा उल्लेख तिच्यात असावा.

१०) पाठाचा आशय, पाठयमुद्दे, मूल्ये.

११) पाठाचा आशय, पाठाचे क्रमाने मुद्दे, आणि मूल्ये.

१२) हस्तपुस्तिकेत पाठातील मूल्ये स्पष्ट असावीत. त्यामुळे ती बिनचूकपणे अध्यापनात बिंबविता येतील.

अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद त्यांच्याच शब्दांत दिल्यामुळे पाल्हाळ, अचूकपणाचा अभाव आणि पुनरुक्ती जाणवते. हे दोष काढून हस्तपुस्तिकेचे स्वरूप कसे असावे याचे वार्वारितेच्या स्वरूपात पुढीलप्रमाणे पुनर्वर्गीकरण करता येईल.

## सारणी क्रमांक ५.१०

### हस्तपुस्तिकेचे स्वरूप

| अनु. | हस्तपुस्तिकेचे स्वरूप | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | पाठातील मूल्यांचे अचूक दिग्दर्शन हस्तपुस्तिकेतून व्हावे. | ८ |
| २. | मूल्ये समजण्यासाठी सोपी उदाहरणे, दाखले दृष्टांत यांचा अंतर्भाव असावा. | ४ |
| ३. | पाठाचा आशय, पाठयमुद्दे, उद्दिष्टे असावीत. | ४ |
| ४. | लेखक, कवी या विषयी माहिती असावी. | ३ |
| ५. | जीवनमूल्यांचे लेखक वा कवीला वाटलेले महत्त्व यावे. | ३ |
| ६. | हस्तपुस्तिकेचे बाह्यस्वरूप लहान असावे. | २ |
| ७. | यशस्वी रीतीने मूल्यसंवर्धनासाठी मार्गदर्शनपर असावे. | २ |
| ८. | हस्तपुस्तिकेत मूल्याधारित प्रश्न असावेत. | २ |

वरील सारणी क्रमांक ५.१० वरून असे दिसून येते की, हस्तपुस्तिकेमधून ' मूल्यांचे अचूक दिग्दर्शन व्हावे ' या संबंधी ८ अध्यापकांनी म्हणजेच ५३.३३ टक्के अध्यापकांनी आपला अभिप्राय व्यक्त केला आहे.

हस्तपुस्तिकेत पाठातील मूल्यांचे अचूक दिग्दर्शन होत असेल तर त्याचा फायदा अध्यापकांना त्यांच्या दैनंदिन अध्यापनात होईल. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन अध्यापनास मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने निश्चित दिशा मिळून त्यांचे अध्यापन मूल्यसंक्रमणाच्या दृष्टीने यशस्वी होण्याची शक्यता वाटते.

मूल्ये विद्यार्थ्यांना समजण्यासाठी ती स्पष्ट करणारी सोपी उदाहरणे, दाखले वा दृष्टांत दिले जावेत असा अभिप्राय व्यक्त करणाऱ्या अध्यापकांची संख्या ४ आहे. म्हणजेच २६.६६ टक्के आहे.

मूल्य ही संकल्पना अमूर्त आहे. उदाहरणे, दाखले, दृष्टांत यामुळे त्यांना मूर्त रूप येते. उदा. विद्यार्थ्यांना ' औदार्य ' समजू शकत नाही पण उदार कर्ण समजू शकतो व त्या उदाहरणाच्या साह्याने ' औदार्य ' हे मूल्य स्पष्ट होऊ शकते. शिवाय विद्यार्थ्यांचा शिकण्याचा मानसशास्त्रीय क्रमही ' मूर्ताकडून अमूर्ताकडे ' असा असतो. त्यामुळे हस्तपुस्तिकेत मूल्य समजण्यासाठी सोपी उदाहरणे, दाखले वा दृष्टांत असावेत. हे म्हणणे संयुक्तिक वाटते. ही उदाहरणे शक्यतो विद्यार्थीजीवनाशी निगडित असावीत असे सुचवावेसे वाटते. त्यामुळे मूल्यांचे आकलन अधिक चटकन् होऊ शकेल.

पाठाचा आशय, पाठ्यमुद्दे व उद्दिष्टे यांचाही हस्तपुस्तिकेत उल्लेख असावा असे मत ४ अध्यापकांनी म्हणजेच २६ टक्के अध्यापकांनी व्यक्त केलेले आहे. आशयात कोणत्या मूल्यांचे प्रतिबिंब पडते हे समजण्यासाठी असे प्रतिपादन आहे.

हस्तपुस्तिकेत लेखक वा कवी तसेच लेखिका व कवयित्री याविषयी माहिती असावी असा अभिप्राय ३ अध्यापकांनी म्हणजेच २० टक्के अध्यापकांनी दिलेला आहे. परंतु पाठ्यपुस्तकात पाठाच्या प्रारंभी अशी माहिती दिलेली असते त्यामुळे त्याचीच पुनरुक्ती न करता 'जीवन मूल्यांचे लेखक वा कवीला वाटलेले महत्त्व याचे स्पष्टीकरण हस्तपुस्तिकेत असावे ' असा अभिप्राय ३ अध्यापकांनी म्हणजेच २० टक्के अध्यापकांनी दिलेला आहे. त्या दृष्टीने स्पष्टीकरण त्यात असावे ही सूचना योग्य वाटते. अशाप्रकारचे स्पष्टीकरण मूल्यसंक्रमणाच्या बीजारोपणासाठी अनुकूल पार्श्वभूमी ठरू शकेल. उदा. वीर सावरकरांची ' ने मजसी ने परत मातृभूमिला ' ही कविता त्यांनी कोणत्या

मन:स्थितीत केली हे विद्यार्थ्यांना समजले तर मूल्यसंक्रमणासाठी ते अनुकूल ठरू शकेल.

हस्तपुस्तिकेचे बाह्य स्वरूप लहान असावे असा अभिप्राय २ अध्यापकांनी (१३.३३ टक्के) दिलेला आहे. परंतु ही सूचना विचारपूर्वक केलेली नाही असे वाटते. याचे कारण असे की हस्तपुस्तिकेचे स्वरूप आणि मूल्यसंक्रमण यांचा काहीही परस्परसंबंध नाही.

मूल्यसंवर्धनाचे कार्य शिक्षकाला यशस्वीरीतीने करता येण्यासाठी मार्गदर्शनपर अशी हस्तपुस्तिका असावी असा अभिप्राय २ अध्यापकांनी म्हणजेच १३.३३ टक्के अध्यापकांनी दिलेला आहे. विषय माध्यमातून मूल्यशिक्षण यशस्वीरीतीने देता येण्यासाठी पाठाचे मूल्यशोधपत्रक, मूल्य रुजविण्यासाठी राबवावयाचे मासिक व कार्यात्मक उपक्रम, दृक्-श्राव्य माध्यमांचा उपयोग, मूल्यमापन पद्धती तसेच मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने घेतल्या जाणाऱ्या पाठाचे नमुना टाचण या सर्व बाबींचा हस्तपुस्तिकेत उल्लेख केल्यास अशी हस्तपुस्तिका अध्यापकांना मार्गदर्शनपर ठरू शकेल.

हस्तपुस्तिकेत मूल्याधारित प्रश्न असावेत असा अभिप्राय २ अध्यापकांनी म्हणजेच १३.३३ टक्के अध्यापकांनी दिलेला आहे. मूल्यांचे विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात संक्रमण झाले आहे त्याचे मूल्यमापन करणे अवघड आहे. त्या दृष्टीने मूल्याधारित प्रश्न कसे विचारावेत याचे मार्गदर्शन होण्यासाठी हस्तपुस्तिकेत मूल्याधारित प्रश्न असावेत ही सूचना योग्य वाटते.

५.११ <u>मूल्ये रुजविण्यासाठी उपक्रमांची योजना</u> :

मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाच्या अनुषंगाने मूल्ये रुजविण्यासाठी अध्यापक काही उपक्रम घेतात काय हे जाणून घेण्याच्या हेतूने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २१ च्या पूर्वभागाची (मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाच्या

अनुषंगाने आपण मूल्ये रुजविण्यासाठी काही उपक्रम घेता का ? ... होय-नाही) योजना केली होती. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद सारणी क्रमांक ५.११ मध्ये दिलेला आहे.

सारणी क्रमांक ५.११

मूल्ये रुजविण्यासाठी उपक्रमांची योजना

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| मूल्ये रुजविण्यासाठी उपक्रमांची योजना | ६ | ९ | १५ |

वरील सारणी क्रमांक ५.११ वरून असे दिसून येते की, पाठयपुस्तकांच्या अध्यापनाच्या अनुषंगाने मूल्ये रुजविण्यासाठी उपक्रम आयोजित करणाऱ्या अध्यापकांची संख्या ६ म्हणजेच ४० टक्के इतकी आहे तर मूल्ये रुजविण्यासाठी उपक्रम आयोजित केले जात नाहीत असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या ९ म्हणजेच ६० टक्के इतकी आहे.

वास्तविक पाहाता विद्यार्थ्यांच्या ठिकाणी मूल्यांचे दृढीकरण होण्यासाठी असे उपक्रम राबविले जाण्याची नितांत आवश्यकता आहे.

या संदर्भात महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणशास्त्र संस्थेने प्रकाशित केलेल्या ' नैतिक शिक्षण ' पुस्तिकेतील ' नैतिक मूल्यांचा संस्कार ' या लेखात उद्धृत केलेले विचार पुढीलप्रमाणे आहेत :

' अध्यापनाचेवेळी जी मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्याचा आपण प्रयत्न केला असेल, ती विद्यार्थ्यांच्या ठिकाणी स्थिर होऊन संस्काराची क्रिया पूर्ण होण्यासाठी अध्यापनाच्या जोडीला काही उपक्रम आवश्यक असतात.

या उपक्रमांची योजना विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांचा संस्कार दृढ होण्यासाठी, त्यांना अनुभव मिळावेत या हेतूने करावयास हवी."

याच प्रश्नाच्या उत्तर भागामध्ये मूल्ये रुजविण्यासाठी उपक्रम घेत असल्यास ते उपक्रम कोणते आहेत याची विचारणा केली होती.

या उपप्रश्नाला दिलेला प्रतिसाद अध्यापकांच्या शब्दांत पुढे दिला आहे :

१) केवळ पाठयपुस्तकातील मूल्ये रुजावीत म्हणून नव्हे तर विद्यार्थ्यांच्यावर सुसंस्कार व्हावे यासाठी वेळोवेळी विद्यालयात जे उपक्रम होतात उदा. वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, खेळ, सहली इत्यादींमध्ये भाग घेण्यास त्यांना प्रवृत्त केले जाते.

२) निबंध व वक्तृत्व स्पर्धा, समाजातील संघर्षपूर्ण विषयावर वादविवाद, नाटय इत्यादी.

३) अवांतर वाचनासाठी ग्रंथालयाची सोय, निबंध स्पर्धा, भाषण स्पर्धा, जयंत्या-पुण्यतिथ्या साजऱ्या करणे व विद्यार्थ्यांपुढे आदर्श ठेवणे असे काही उपक्रम आयोजित केले जातात.

४) भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा, सामुदायिक जीवनाचे उपक्रम, क्रीडा स्पर्धा, समाजसेवा, श्रमदान इत्यादींद्वारे मूल्य रुजविण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच थोर राष्ट्रपुरूषांच्या जयंत्या-पुण्यतिथ्या या सारख्या उपक्रमातून त्यांचे समोर आदर्श ठेवला जातो.

५) अवांतर वाचनास उत्तेजन, भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा, राष्ट्रीय सण-उत्सवाचे निमित्ताने राष्ट्रपुरूषांची चरित्रे सांगणे.

६) सांस्कृतिक कार्यक्रम, सुविचार, भाषणे, वादविवाद स्पर्धा.

प्रस्तुत प्रतीत छापील पानांपैकी कोरी पाने
या ग्रंथाचे विभाग नाहीत आणि आहे.

वरील प्रतिसाद प्रतिसादकांच्याच शब्दांत असल्याने त्यात पुनरुक्ती जाणवते. ती पुनरुक्ती काढून मूल्य रूजविण्यासाठी अध्यापक घेत असलेल्या उपक्रमांचे वारंवारितेच्या स्वरूपात पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

सारणी क्रमांक ५.१२

मूल्य रूजविण्यासाठी घेतले जाणारे उपक्रम

| अनु. | मूल्य रूजविण्यासाठी घेतले जाणारे उपक्रम | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | स्पर्धा - निबंध, वक्तृत्व, वादविवाद. | १३ ✓ |
| २. | सामुदायिक जीवनाचे उपक्रम, श्रमदान, समाजसेवा, सांस्कृतिक कार्यक्रम. | ४ |
| ३. | जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या करणे. | ३ |
| ४. | खेळ किंवा क्रीडा स्पर्धा | २ |
| ५. | अवांतर वाचनास उत्तेजन | २ |
| ६. | सहली | १ |
| ७. | विद्यार्थ्यांचे नाटक बसविणे | १ |
| ८. | सुविचार सांगणे | १ |
| ९. | बाहेरील वक्त्यांची भाषणे आयोजित करणे | १ |

वरील सारणी क्र. ५.१२ वरून असे निदर्शनास येते की, अध्यापक विद्यार्थ्यांचे ठिकाणी मूल्ये रूजावीत यासाठी विविध उपक्रम घेतात. मूल्य रूजविण्याच्या दृष्टीने ही बाब अतिशय स्वागतार्ह आहे.

मूल्य रुजविण्यासाठी अध्यापक ` निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व वादविवाद ` या उपक्रमांचा सर्वात अधिक वापर करतात. त्या खालोखाल सामुदायिक जीवनाचे उपक्रम, श्रमदान, समाजसेवा, सांस्कृतिक कार्यक्रम, जयंत्या व पुण्यतिथ्या, साऱ्या करणे, खेळ किंवा क्रीडा स्पर्धा, अवांतर वाचनास उत्तेजन, सहली, विद्यार्थ्यांचे नाटक बसविणे, सुविचार सांगणे, बाहेरील वक्त्यांची भाषणे आयोजित करणे या उपक्रमांचा क्रम लागतो.

विद्यार्थ्यांचे ठिकाणी मूल्ये रुजावित यासाठी राबविले जाणारे ` वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद, अवांतर वाचनास उत्तेजन ` हे उपक्रम केवळ बौध्दिक पातळीवर भर देणारे आहेत. परंतु क्रियात्मक पातळीवर विद्यार्थ्यांचा विकास व्हावा या दृष्टीने सामुदायिक जीवनाचे उपक्रम - श्रमदान, समाजसेवा, सहली या सारखे उपक्रम - कमी राबविले जातात असे आढळते.

५.१२ <u>मूल्यसंक्रमणाचे प्रमाण</u> :

अध्यापक विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करू इच्छिणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात संक्रमित होतात हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २२ ची (आपण संक्रमित करू इच्छिणारी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात संक्रमित होतात ?) योजना केली होती. प्रश्नाखाली पाच पर्याय दिलेले होते. अध्यापकांना सहमत असलेल्या एका पर्यायासमोर बरोबर (  ) अशी खूण करावयास सांगितली होती.

या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद सारणी क्रमांक ५.१३ मध्ये दिलेला आहे.

प्रस्तुत आदेश शैक्षणिक धारणांच्या स्वीकार करणा
या उद्देशाने लिहून काढला आहे.

सारणी क्रमांक ५.१३

मूल्यसंक्रमणाचे प्रमाण

| | संपूर्ण-पणे | ब-याचशा प्रमाणात | सांगता येत नाही | अल्प प्रमाणात | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मूल्य-संक्रमणाचे प्रमाण | - | १० | २ | ३ | - | १५ |

वरील सारणी क्रमांक ५.१३ वरून असे दिसून येते की, अध्यापक विद्यार्थ्यांमध्ये जी मूल्ये संक्रमित करू इच्छितात ती विद्यार्थ्यांत ` ब-याचशा प्रमाणात ` संक्रमित होतात असे दहा अध्यापकांचे म्हणजेच ६६.६६ टक्के अध्यापकांचे मत आहे. ही समाधानाची बाब आहे.

विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये ` अल्प प्रमाणात ` संक्रमित होतात असे ३ अध्यापकांचे म्हणजेच २० टक्के अध्यापकांचे मत आहे. तर विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये किती प्रमाणात संक्रमित होतात हे ` सांगता येत नाही ` असे २ अध्यापकांचे म्हणजेच १३.३३ टक्के अध्यापकांचे मत आहे.

५.१३ मूल्यसंक्रमणात येणा-या अडचणी :

मूल्यसंक्रमणात अध्यापकांच्या मते कोणकोणत्या अडचणी येतात हे जाणून घेण्याच्या हेतूने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २३ ची (मूल्यसंक्रमण करण्यात कोणकोणत्या अडचणी येतात ?) करण्यात आली होती. या प्रश्नाला १५ अध्यापकांनी पुढीलप्रमाणे प्रतिसाद दिला आहे :

१) वेळेचा अभाव, मूल्ये आणि परीक्षा पध्दती व प्रश्नपत्रिकेचे स्वरूप यामध्ये भिन्नता असते, कमी कालावधीत अभ्यासक्रम संपवावा लागतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

२) वेळेचा अभाव, मूल्ये आणि परीक्षा पध्दती व प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वेगळे, कमी कालावधीत अधिक अभ्यासक्रम.

३) अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टीने, मूल्यसंक्रमण करण्यास व्यवहारी जीवनातील जादा उदाहरणे देता येत नाहीत, सांगितलेली मूल्ये बाह्य जीवनात विसंगत ठरतात.

४) ठराविक वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो व परीक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची तयारी करून घ्यावी लागते. विशेषत: १२ वीला. त्यामुळे मूल्यसंक्रमणासाठी आवश्यक तेवढा वेळ देता येत नाही. काहीवेळा विद्यार्थ्यांतही त्याबद्दल अनास्था आढळते. ह्या अडचणी येतात.

५) कौटुंबिक वातावरण व शालेय वातावरण यात मूल्यशिक्षणाचे दृष्टीने जेव्हा तफावत आढळते तेव्हा मूल्यसंक्रमणात अडचणी येतात. उदा. घरातील पैसे चोरले तर शिक्षा होत नाही पण शाळेत चोरी केली तर शिक्षक शिक्षा करतात अशी संस्कारांच्या बाबतीत काहीवेळा तफावत आढळते तेव्हा अडचणी जाणवते.

६) समाजात ` आदर्श ` कुणाचे राहिले नाहीत, विद्यार्थ्यांची अनास्था, विधायक कार्याबद्दल आवड नसणे, प्रत्येक जणात स्वत: पुरते पाहाण्याची वृत्ती निर्माण झाली आहे.

७) मुख्यत: पुरेसा वेळ आवश्यक आहे. काही उपक्रमासाठी आर्थिक तरतूद नसते. उपक्रमासाठी मुलांमुलींना मोकळेपणी एकत्र येण्यात अडचण असते, पालकांचे सहकार्यही आवश्यक असते. पुरेशा प्रमाणात जर ते उपलब्ध झाले नाही तर तिही अडचणच आहे. शिक्षणाच्या सर्वत्रिकरणामुळे हल्ली शाळेत समाजाच्या सर्व थरातील मुले येतात पण जीवनमूल्यांचे महत्व सर्वांना उमगले असेलच असे सांगता येत नाही.

८) राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनात झालेली मूल्यांची अधोगती व त्यामुळे सर्वच समाज जीवनावर त्याचा झालेला दु:ष्परिणाम ही मोठी अडचण आहे. स्वैर व बंधमुक्त जीवनाची वाढती आसक्ती, केवळ भौतिक सुखासाठी धावपळ इ. बाबी हा मूल्यसंक्रमणातील अडसर आहेत.

९) अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे बंधन असते. त्यासाठी ठराविक तासिकाच उपलब्ध असतात व मूल्यसंक्रमणाचे दृष्टीने तो वेळ अपुरा वाटतो. तसेच वर्गातील विद्यार्थ्यांची भरमसाठ संख्या यामुळे वैयक्तिक लक्ष देता येत नाही. मूल्यसंक्रमणासाठी व्यवहारी जीवनातील जादा उदाहरणे सांगता येत नाहीत.

१०) विद्यार्थ्यांमध्ये असणारी उदासिनता, वैफल्य, चांगला आदर्श डोळ्यांसमोर नसणे, दारिद्र्य या अडचणी येतात.

११) आजची सामाजिक परिस्थिती, तिच्यातील अनेक दोष त्यामुळे मुलांमध्ये मूल्ये तग धरून राहू शकत नाहीत. पालकांचे आपल्या पाल्याकडे दुर्लक्ष, विद्यार्थ्यांची केवळ परीक्षार्थी वृत्ती हा अडचणी येतात. कृतिशिलता कमी, शाश्वतसुखाऐवजी केवळ भौतिक सुखामागे धावण्याची प्रवृत्ती.

१२) विद्यार्थ्यांची मूल्ये स्विकारण्याची प्रवृत्ती नसते. सुशिक्षित बेकारी या सामाजिक प्रश्नामुळे त्यांच्यात या बाबतीत उदासिनता आढळते. आजचा विद्यार्थी केवळ परीक्षार्थी बनलेला दिसतो. या शिवाय मराठी विषय सोपा या भावनेपोटी सर्वच बाबतीत दुर्लक्ष करतो. सबब अध्यापनाचे-वेळी शिक्षक काहीसा असहाय्य ठरतो.

१३) विद्यार्थ्यांची मूल्ये स्वीकारण्याची प्रवृत्ती नसते. याचे मुख्य कारण सामाजिक बेकारी त्यामुळे शिक्षकाबद्दल निर्माण झालेली निरिच्छता व तुच्छता, शिक्षणातील परीक्षार्थीपणाचा दोष, मराठी विषय हा परीक्षेच्या दृष्टीने पास होण्यास सोपा असल्यामुळे दुर्लक्ष त्यामुळे, मूळ मूल्यांकडे दुर्लक्ष. तुलनेने शिक्षक काहीसा असहाय्य ठरतो.

१४) सामाजिक गतीचा प्रभावी विरोध, नीती-मूल्यांवरील निष्ठांचा अभाव, स्वैर व बंधमुक्त जीवनाची वाढती आसक्ती व परीक्षेतून गुणवत्तेची वाढती अपेक्षा.

१५) विद्यार्थ्यांकडून अल्प प्रतिसाद मिळतो, व्यासंग कमी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अधिक लक्ष अभ्यासावर केंद्रित करता येत नाही.

वरील प्रतिसाद अध्यापकांच्याच शब्दांत दिला असल्याने त्यात पुनरुक्ती आढळून येते. ही पुनरुक्ती काढून मूल्यसंक्रमणात कोणकोणत्या अडचणी येतात त्याचे वारंवारितेच्या स्वरूपात पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

सारणी क्रमांक ५.१४

मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणी

| अनु. | मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणी | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने | ८ |
| २. | विद्यार्थ्यांमधील अनास्था | ६ |
| ३. | विद्यार्थ्यांची केवळ परीक्षार्थी वृत्ती | ४ |
| ४. | मूल्य आणि परीक्षा पद्धतीतील भिन्नता व प्रश्नपत्रिकेचे स्वरूप | ४ |
| ५. | राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनात झालेली मूल्यांची अधोगती व त्याचा दुष्परिणाम | ३ |
| ६. | पालकांचे अपुरे सहकार्य | २ |
| ७. | समाजातील आदर्शांचा अभाव | २ |
| ८. | सुशिक्षित बेकारी या दोषामुळे उदासीनता | २ |
| ९. | मराठी विषय सोपा या भावनेमुळे दुर्लक्ष | २ |
| १०. | स्वैर व बंधमुक्त जीवनाची वाढती आसक्ती | २ |

सारणी क्र. ५.१४ (पुढे चालू...)

| अनु | मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणी | वारंवारिता |
|---|---|---|
| ११. | केवळ भौतिक सुखासाठी धावपळ | २ |
| १२. | व्यवहारी जीवनातील जादा उदाहरणे देता न येणे | २ |
| १३. | दारिद्र्य व आर्थिक तरतूद उपलब्ध नसणे | २ |
| १४. | वर्गातील विद्यार्थ्यांच्या भरमसाठ संख्येमुळे वैयक्तिक लक्ष देता येत नाही | १ |
| १५. | नीतिमूल्यांवरील निष्ठेचा अभाव | १ |
| १६. | कौटुंबिक वातावरण व शालेय वातावरण यात मूल्यांच्या दृष्टीने तफावत | १ |
| १७. | सांगितलेली मूल्ये बालजीवनात विसंगत ठरतात | १ |
| १८. | परीक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची तयारी करून घ्यावी लागते | १ |
| १९. | विधायक कार्याबद्दल आवड नसणे | १ |
| २०. | स्वत:पुरते पाहाण्याची वृत्ती | १ |
| २१. | मुलामुलींना मोकळेपणी एकत्र येण्यात अडचण | १ |

वरील सारणी क्रमांक ५.१४ वरून असे आढळून येते की, मूल्यसंक्रमणात अनेक प्रकारच्या अडचणी येतात. अध्यापकांना जाणवत असलेली सर्वात प्रमुख अडचण ` अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करणे ` ही होय. त्या खालोखाल अनुक्रमे विद्यार्थ्यांमधील अनास्था, विद्यार्थ्यांची केवळ परीक्षार्थी वृत्ती, मूल्य आणि परीक्षा पध्दतीतील भिन्नता व प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, राजकीय-सामाजिक-आर्थिक जीवनात झालेली मूल्यांची अधोगती व त्याचा दुष्परिणाम पालकांचे अपुरे सहकार्य, समाजातील आदर्शांचा अभाव, सुशिक्षित बेकारी

या दोषांमुळे उदासीनता, मराठी विषय सोपा या भावनेमुळे दुर्लक्ष, स्वैर व बंधमुक्त जीवनाची वाढती आसक्ती, केवळ भौतिक सुखासाठी धावपळ, व्यवहारी जीवनातील जादा उदाहरणे देता न येणे, दारिद्र्य व आर्थिक तरतूद उपलब्ध नसणे, वर्गातील विद्यार्थ्यांच्या भरमसाठ संख्येमुळे वैयक्तिक लक्ष देता न येणे, नीतीमूल्यांवरील निष्ठांचा अभाव, कौटुंबिक वातावरण व शालेय वातावरण यात मूल्यांच्या दृष्टीने तफावत, सांगितलेली मूल्ये बाह्य जीवनात विसंगत ठरतात, परीक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची करून घ्यावी लागणारी तयारी, विधायक कार्याबद्दल आवड नसणे, स्वत:पुरते पाहाण्याची वृत्ती, मुलामुलींना मोकळेपणी एकत्र येण्यात अडचण या अडचणींचा क्रम लागतो.

' अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करावा लागतो ' म्हणून मूल्यसंक्रमणात अडचण येते या मताशी सहमत होता येत नाही. कारण शिक्षणातून केवळ परीक्षार्थी निर्माण करावयाचे नाहीत. अभ्यासक्रम पूर्ण करणे हेही अध्यापनाचे उद्दिष्ट असू शकत नाही तर तो अभ्यासक्रम ज्या विद्यार्थ्यांसाठी आहे त्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास त्यातून होणे महत्वाचे आहे. शिवाय मूल्यसंक्रमण हे पाठांचे अध्यापन करीत असतानाच करावयाचे आहे. त्यासाठी वेगळा वेळ देण्याची गरज नाही. म्हणून विद्यार्थ्यांचे ठिकाणी मुल्यसंवर्धन करणे हे शिक्षणाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे हे लक्षात ठेवूनच अभ्यासक्रम पूर्ण करणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे.

राजकीय-सामाजिक-आर्थिक क्षेत्रातील मूल्यांची अधोगती झालेली आहे व त्यामुळे शिक्षणक्षेत्रातील मूल्यसंक्रमणास अडथळा होतो याचा विचार करूनही मूल्य रुजविण्याचे एक महत्वाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जावे.

५.१४ मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणींवर उपाय : ✓

मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणींवर कशाप्रकारे मात करता येईल हे जाणून घेण्याच्या हेतूने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २४ ची (या अडचणींवर आपल्या मते कशाप्रकारे मात करता येईल ?) योजना केली होती.

या प्रश्नाला १५ अध्यापकांनी पुढीलप्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे :

१) जादा वेळ देऊन, प्रश्नपत्रिकेत मूल्यांना महत्व द्यावे, मर्यादित विद्यार्थी संख्या असणे गरजेचे, पाठयपुस्तकाशिवाय अधिक – इतर संदर्भ ग्रंथांचा पुरवठा गरजेचा आहे.

२) जादा वेळ देऊन, मूल्याधारित परीक्षा पध्दती, मर्यादित विद्यार्थी संख्या, पाठयपुस्तकाधारित इतर संदर्भ ग्रंथांचा पुरवठा करणे आवश्यक.

३) पाठात किंवा कवितेत मूल्य दर्शविणारी एखादी ओळ असते. एखादा शब्द असतो, त्याचा आधार घेऊन विवेचन करून मूल्य ठसविता येते. व्यावहारिक जीवनात विसंगत मूल्ये असतात, हे प्रथमच सांगून विद्यार्थ्यांची मनोवृत्ती तयार करावी, व्यावहारिक उदाहरणे मूल्य ठसविण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात.

४) थोडासा अधिक वेळ देऊन मूल्यसंक्रमण करता येईल. आजच्या सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करता विद्यार्थ्यांत भावनिक व कृतीपातळीवर वर्तन-परिवर्तन घडणे गरजेचे वाटते. केवळ परीक्षार्थी म्हणून त्याची तयारी न करून घेता तो उद्याचा नागरिक आहे म्हणून त्याचे ठिकाणी मूल्यनिर्मिती होणे महत्वाचे वाटते.

५) मूल्यशिक्षणाचे दृष्टीने पालकांना त्याचे महत्त्व पटवून देऊन यासाठी पालक मेळावे भरविणे व त्यांच्यात ह्या दृष्टीने अधिक जागृती निर्माण करणे गरजेचे वाटते.

६) विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण करणे चांगल्या आणि विधायक कार्याबद्दल विद्यार्थ्यांच्यात आस्था निर्माण करणे, समाजातील आदर्शांकडे - चांगुलपणाकडे त्यांचे लक्ष वेधणे.

७) शाळेच्या वेळा व्यतिरिक्त वेळ द्यावा लागेल, पैशाचा प्रश्न सोडविल्यास व पालकांचे सहकार्य मिळाल्यास अडचणींवर मात करता येईल. प्रसंगी पालकांचेही मेळावे घेऊन याबाबत उद्बोधन करावे लागेल.

८) परीक्षा पध्दतीत बदल करणे, आतापर्यन्त केवळ कागदोपत्री राहिलेला पण प्रत्यक्षात न स्विकारलेला मूल्यमापनाचा दृष्टिकोन स्वीकारावा लागेल

मूल्यमापन = विद्यार्थ्यांची गुणात्मक प्रगती + संख्यात्मक प्रगती + शिक्षकांचा अभिप्राय

येथे ` शिक्षकांचा अभिप्राय ` याला महत्वाचे स्थान मिळावे.

९) वर्गातील विद्यार्थी संख्या नियंत्रित केल्यास वैयक्तिक लक्ष देता येईल, तासिकांची संख्या वाढवून उपाय करता येईल.

१०) विद्यार्थ्यांसमोर चांगला आदर्श ठेवणे, त्यांच्यावर सुसंस्कार करणे, त्यांना विज्ञानयुगात योग्य मार्ग दाखविणे.

११) सामाजिक परिस्थिती बदलण्याचे सामर्थ्य एकट्या शिक्षकात नाही. तिथे तो कमी पडतो. केवळ पालकांना तो काही सूचना करू शकेल व विद्यार्थ्यांच्या मनावरच शक्यतो अधिक परिणाम होऊ शकेल असा उपदेश वा संस्कार तो आपल्यापरीने करून ही अडचण सोडविण्यास मदत करू शकेल पण मात करू शकणार नाही.

१२) शिक्षक, आजची सामाजिक परिस्थिती, आजची शिक्षण पध्दती, शिक्षकांना मिळणारे सहाय्य या बाबींचा विचार करता केवळ शिक्षक याबाबतीत काही करू शकेल असे वाटत नाही. त्यास योग्य

प्रतिसाद मिळणे केवळ अशक्य, शिक्षकांच्या कुवती पलिकडचे सामाजिक व विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने हे विषय विस्तृत वाटतात. सबब आपण या अडचणींवर मात करू हे अशक्यप्राय आहे.

१३) फक्त ' शिक्षक ' ह्या संस्थेचा विचार करता रूढ शिक्षण पध्दती व सामाजिक स्थिती विचारात घेतल्यास शिक्षक फार काही करू शकेल यावर माझा विश्वास नाही. समाज बदलणे, बेकारी हटविणे असले विषय हे विस्तृत आहेत. शिक्षकाच्या कुवती पलिकडचे आहेत. त्यामुळे यावर आपण मात करू शकू असे वाटत नाही.

१४) परीक्षा पध्दतीत बदल केला पाहिजे. जाणीवपूर्वक अध्यापनाने मूल्यसंक्रमण होऊ शकते.

१ ५) अभ्यासाचे वातावरण निर्माण करणे, पूर्णवेळ अभ्यासास देणे, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप मूल्यांवर आधारित ठेवणे.

वरील प्रतिसाद अध्यापकांच्याच शब्दात दिला असल्याने त्यात पुनरुक्ती आढळून येते. ही पुनरुक्ती काढून मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणींवर कशाप्रकारे मात करता येईल त्याचे वारंवारितेच्या स्वरूपात पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

## सारणी क्रमांक ५.१५

### मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणींवर उपाय ✓

| अनु. | मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणींवर उपाय | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | जादा वेळ देऊन | ६ |
| २. | परीक्षा पध्दतीत बदल करून व प्रश्नपत्रिका मूल्याधिष्ठित ठेवून | ५ |
| ३. | शिक्षक पालक मेळावे भरवून व पालकांना मूल्यशिक्षणाचे महत्व पटवून | ५ |
| ४. | मर्यादित विद्यार्थी संख्या असणे गरजेचे | ३ |
| ५. | संदर्भ ग्रंथांचा पुरवठा | २ |
| ६. | विद्यार्थ्यांत शिक्षणाची गोडी निर्माण करणे | २ |
| ७. | समाजातील आदर्शांकडे लक्ष वेधून | २ |
| ८. | भावनिक व कृतिमात्मकीवरील वर्तन परिवर्तन घडवून | २ |
| ९. | मूल्यप्रतिबिंबित होणाऱ्या भागावर अधिक भर देऊन | १ |
| १०. | विद्यार्थ्यांची अनुकूल मनोवृत्ती तयार करून | १ |
| ११. | विधायक कार्याबद्दल आस्था निर्माण करून | १ |
| १२. | आर्थिक तरतूद करून | १ |

वरील सारणी क्रमांक ५.१५ वरून असे आढळून येते की, मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणींवर मात करण्याच्या उपायांमध्ये ` जादा वेळ देऊन ` या उपायाचा अग्रक्रम लागतो. त्या खालोखाल परीक्षा पध्दतीत बदल करून व प्रश्नपत्रिका क मूल्याधिष्ठित ठेवून, शिक्षक पालक मेळावे भरवून,

पालकांना मूल्य शिक्षणाचे महत्व पटवून देऊन, विद्यार्थी संख्या मर्यादित ठेवून, संदर्भ ग्रंथांचा पुरवठा करून, विद्यार्थ्यांत शिक्षणाची गोडी निर्माण करून, समाजातील आदर्शांकडे लक्ष वेधून, भावनिक व कृतिपातळीवरील वर्तन-परिवर्तन घडवून, मूल्य प्रतिबिंबित होणाऱ्या भागावर अधिक भर देऊन, विद्यार्थ्यांची अनुकूल मनोवृत्ती वरून व आर्थिक तरतूद करून या उपायांचा क्रम लागतो.

` जादा वेळ देऊन ` ही समस्या सोडविता येईल असा जो अध्यापकांचा अभिप्राय आहे याबाबत असे म्हणावेसे वाटते की, अध्यापकांचा हा अभिप्राय तितकासा बरोबर आहे असे वाटत नाही. कारण मूल्यसंक्रमण करण्यासाठी जादा वेळ देण्याची आवश्यकता नाही. मूल्यशिक्षण हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय नाही. पाठ्यक्रमातील विविध विषय व अभ्यासपूरक उपक्रम यामधून तो एकात्म पध्दतीने व योजनाबध्द रीतीने हाताळावयाचा आहे.

## ५.१५ मूल्य संक्रमित न होण्याची कारणे :

अध्यापकांच्या दैनंदिन अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंक्रमण होत नसेल तर त्याची कोणकोणती कारणे संभवतात हे जाणून घेण्याच्या हेतूने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २५ च्या पूर्वभागाची (मूल्ये संक्रमित होत नसतील तर त्याची खालील पैकी कोणती कारणे संभवतात ?) योजना केली होती. हा प्रश्न बंदिस्त व मुक्त अशा दोन्ही स्वरूपाचा होता. त्या प्रश्नाच्या बंदिस्त स्वरूपात ५ विधाने दिलेली होती आणि ज्या कारणांशी अध्यापक सहमत आहेत त्या कारणासमोर संमतीदर्शक ( ✓ ) खूण करावयास सांगितली होती. या उपप्रश्नामधून मिळालेली माहिती सारणी क्रमांक ५.१६ मध्ये वारंवारितेच्या स्वरूपात नमूद केली आहे.

प्रस्तुत आलेख संबंधित वाचकांच्या समोर यावा
या उद्देशाने विकल्प मांडून छापला आहे.

## सारणी क्रमांक ५.१६

## मूल्य संक्रमित न होण्याची कारणे

| अनु. | मूल्य संक्रमित न होण्याची कारणे | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | मूल्यसंक्रमण होण्यासाठी ` आदर्शांची ` गरज असते व हे ` आदर्श ` कुटुंब, शाळा, समाज यातून प्रत्येक वेळी, आवश्यक तेव्हा उपलब्ध होतीलच असे नाही. | १२ |
| २. | काही वेळा विद्यार्थ्यांला प्रत्यक्षात-व्यवहारात - समाजात संक्रमित झालेल्या मूल्यांच्या विरूध्द अनुभव आल्याने त्याची मते पुन्हा बदलतात व त्याचे ठिकाणी ती मूल्ये स्थिर होत नाहीत. | ७ |
| ३. | केवळ ३५ वा ४० मिनिटांच्या तासात मूल्यसंक्रमण करणे अशक्य ठरते. | ५ |
| ४. | मूल्यसंक्रमण म्हणजे विद्यार्थ्यांतील भावनिक बदल असल्याने तो तात्पुरत्या स्वरूपाचा असतो. | ५ |
| ५. | केवळ तेवढया तासापुरते, त्या भावनिक वातावरणात विद्यार्थ्यांला ते मूल्य योग्य वाटते पण वातावरण बदलताच विद्यार्थ्यांच्या मन:प्रवृत्तीत पुन्हा बदल होतो. | ५ |

वरील सारणी क्रमांक ५.१६ वरून असे आढळून येते की, विद्यार्थ्यां-मध्ये दैनंदिन अध्यापनातून बिंबविली जाणारी मूल्ये संक्रमित न होण्याचे प्रमुख कारण म्हणजे ` आदर्शांचा ` अभाव हे होय व हे आदर्श कुटुंब, शाळा, समाज यातून उपलब्ध व्हावेत असे मत १२ अध्यापकांनी म्हणजेच ८० टक्के अध्यापकांनी व्यक्त केलेले आहे. त्या खालोखाल काहीवेळा विद्यार्थ्यांला

प्रत्यक्षात - व्यवहारात - समाजात, संक्रमित झालेल्या मूल्यांच्या विरुध्द अनुभव आल्याने त्यांची मते पुन्हा बदलतात व त्यांचे ठिकाणी ती मूल्ये स्थिर होत नाहीत, केवळ ३५ वा ४० मिनिटांच्या तासात मूल्यसंक्रमण करणे अशक्य ठरते, मूल्यसंक्रमण म्हणजे विद्यार्थ्यांतील भावनिक बदल असल्याने ती तात्पुरत्या स्वभावाचा असतो, केवळ तेवढया तासापुरते - त्या भावनिक वातावरणात विद्यार्थ्याला ते मूल्य योग्य वाटते पण वातावरण बदलताच विद्यार्थ्यांच्या मन:प्रवृत्तीत पुन्हा बदल होतो. या कारणाचा क्रम लागतो.

मूल्यसंक्रमण होण्यासाठी आदर्शांची गरज असते. दिवसेंदिवस कुटुंब, शाळा, समाज यातून जे आदर्श विद्यार्थ्यांसमोर असायला हवे आहेत ते कमी होताहेत ही वस्तुस्थिती आहे. पण शाळा ही समाजाची आदर्श प्रतिकृती आहे. त्या दृष्टीने शाळेतून आदर्श उपलब्ध व्हावेत. विद्यार्थ्यांवर संस्कार हे वातावरणातून होतात. त्यात सर्वांचेच वर्तन येते ते संस्कारपूर्ण असावयास हवे. विद्यार्थ्यांपुढे आदर्श उपस्थित करण्यासाठी थोर राष्ट्र-पुरूषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साजऱ्या केला जाव्यात महान राष्ट्रपुरूषांच्या तसबिरी शाळेत लावून तसेच त्यांच्या बोधपर शिकवणुकीची वाक्ये भिंतीवर लिहून (बोलक्या भिंती) शाळेचे वातावरण संस्काराला अनुकूल राखता येईल.

मूल्यसंक्रमण न होण्याचे दुसरे कारण ' काहीवेळा विद्यार्थ्याला प्रत्यक्षात, व्यवहारात, समाजात संक्रमित झालेल्या मूल्यांच्या विरुध्द अनुभव येतो व त्याची मते पुन्हा बदलतात ' असा अभिप्राय सात अध्यापकांनी म्हणजेच ४६.६६ टक्के अध्यापकांनी दिला आहे. या संदर्भात असे म्हणता येईल की, प्रतिकूल परिस्थितीतसुध्दा जो मूल्यांशी एकनिष्ठ असतो तीच मूल्य रुजल्याची मोठी कसोटी मानावी लागेल आणि या निकषापर्यन्त मूल्य रुजविणे हे मूल्यशिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे हे लक्षात घेऊनच विद्यार्थ्याला त्या उंचीपर्यन्त जाता येईल इतपत प्रयत्न केला पाहिजे.

याच प्रश्नाच्या उत्तर भागामध्ये या व्यतिरिक्त आणखी काही कारणे असल्यास ती कोणती याची विचारण केली होती. या उपप्रश्नाला दिलेला प्रतिसाद अध्यापकांच्या शब्दांत पुढीलप्रमाणे आहे :

१) विद्यार्थी संख्या अधिक असल्याने व वेळ अपुरा असल्याने.

२) साहित्यातील मूल्यसंक्रमणासाठी केवळ वर्गातील अध्ययन अपुरे वाटते. कारण मूल्य हा संस्कार विद्यार्थ्यांवर आपोआप संस्कारीत होणे गरजेचे आहे. इतरांच्या वर्तनाच्या निरीक्षणातून तो घडत असतो. शालेय जीवनापेक्षा त्यास समाजात विचित्र-भिन्न स्थिती दिसते. त्यामुळे केवळ वर्गात उपदेश करणे निरुपयोगी आहे. त्यासाठी शालेय तसेच सामाजिक वातावरण हे मूल्याधारित हवे. तरच ते ` संस्कार ` विद्यार्थ्यांवर घडतील अन्य प्रयत्न निरुपयोगीच ठरतील.

३) मूल्यसंक्रमणासाठी शिकविणे हे मूलत: चूक आहे. मूल्य हा ` संस्कार ` असतो. ती करावयाची गोष्ट नव्हे. ` संस्कार ` घडत असतो माणसांच्या वर्तनातून. तो स्वीकारला जातो. ` खोटे बोलू नये ` हेच जर आपण खोटेपणाने सांगत असू तर तो संस्कार होणार नाही. घडते आहे ते उपदेशाच्या थाटात. उपदेश निरुपयोगी असतो. त्यामुळे सर्वच वातावरण मूल्याधारित असेल तरच ते ` संस्कार ` होतील. अन्यथ: ते निरुपयोगी आहेत.

विद्यार्थी संख्या अधिक असल्याने व वेळ अपुरा असल्याने हे दोन मुद्दे यापूर्वीच येऊन गेलेले आहेत. (पहा पृष्ठांक ? ).

मूल्यसंक्रमण म्हणजेच ` संस्कार ` व हे संस्कार घडण्यासाठी शालेय व सामाजिक वातावरण तसेच कौटुंबिक वातावरण हे मूल्याधिष्ठित असावे. हा अभिप्राय पटण्यासारखा आहे. ` संस्कार ` हे कष्ट साध्य अमूर्त धन आहे. त्याची आराधना करावी लागते. घर, आई-वडील, मित्रमंडळी,

प्रस्तुत [illegible] संपादित करणाऱ्या [illegible] [illegible]
या औदार्याने [illegible] [illegible] [illegible] आहे.

शिक्षक, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे आणि वाचनालये ही सर्व संस्कारांची प्रभावी व परिणामकारक अशी केंद्रे आहेत.

५.१६ मूल्यांचे मूल्यमापन :

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २६, २७, २८ हे ` मूल्यांचे मूल्यमापन ` या मुद्यांशी संबंधित होते.

प्रश्न क्रमांक २६ (विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होणाऱ्या मूल्यांचे मूल्यमापन करावे काय ? .... होय-नाही) हा विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होणाऱ्या मूल्यांचे मूल्यमापन करावे की नको हे जाणून घेण्याच्या इच्छेने विचारला होता. प्रस्तुत प्रश्नाला दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणीत (सारणी क्रमांक ५.१७) वर्गीकरण केलेले आहे.

सारणी क्र. ५.१७

मूल्यांचे मूल्यमापन

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| मूल्यांचे मूल्यमापन करण्यासंबंधीचा अभिप्राय | ५ | १० | १५ |

वरील सारणी क्रमांक ५.१७ वरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होणाऱ्या मूल्यांचे मूल्यमापन करू नये असे १० अध्यापकांचे म्हणजेच शेकडा ६६.६६ टक्के अध्यापकांचे मत आहे. तर विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होणाऱ्या मूल्यांचे मूल्यमापन करावे असे ५ अध्यापकांचे म्हणजेच ३३.३३ टक्के अध्यापकांचे मत आहे.

या प्रश्नातच ज्यांनी ` होय ` असे उत्तर दिले असेल त्यांना हे मूल्यमापन कसे करावे (उत्तर ` होय असल्यास कसे करावे ?) याची विचारणा केलेली होती.

या उपप्रश्नाला ५ अध्यापकांनी म्हणजेच शेकडा ३३.३३ टक्के अध्यापकांनी पुढीलप्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे :

१) मूल्यांचे मूल्यमापन करण्यासाठी ` स्वयंमूल्यमापन ` तंत्राचा अवलंब केला जावा. त्यासाठी विद्यार्थ्यांना दैनंदिनी लिहावयास सांगावी व त्यांच्या स्वत:मध्येच काय परिवर्तन झाले याची नोंद त्या ठिकाणी असावी व त्यावरून मूल्यांचे मूल्यमापन व्हावे.

२) काही प्रसंग निर्माण करून त्यावेळी तो कसा वागतो - यावरून मूल्यमापन करावे. उदा. गरिबांविषयी कळवळा - गरिबांना मदत करतो किंवा नाही हे पाहून मूल्यमापन करावे.

३) विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होणाऱ्या मूल्यांचे मूल्यमापन करताना त्याचे वर्तन, त्याची बदलती प्रवृत्ती, संस्काराचा परिणाम याचे अवलोकन करावे. त्यावरून मूल्ये किती रुजली आहेत हे निदर्शनास येईल.

४) दैनंदिन वर्तनाचे निरीक्षण, मुलाखत, सृजनात्मक काम, समस्यापूर्ती चाचणी.

५) आजच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप बदलून ती मूल्यावर आधारित ठेवावी व चाचणी पध्दतीने मूल्यमापन करावे.

वरील प्रतिसाद प्रतिसादकांच्याच शब्दात असल्याने त्यात पुनरुक्ती जाणवते. ती पुनरुक्ती काढून मूल्यांचे मूल्यमापन करण्याच्या प्रकाराबाबतचे अध्यापकांच्या मताचे वारंवारितेच्या स्वरूपात पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

सारणी क्रमांक ५.१८

मूल्यांचे मूल्यमापन करण्याचे प्रकार

| अनु. | मूल्यमापनाचे प्रकार | वारंवारिता |
|---|---|---|
| १. | निरीक्षण | २ |
| २. | चाचणी | २ |
| ३. | मुलाखत | १ |
| ४. | सृजनात्मक कार्य | १ |
| ५. | प्रसंगनिर्मिती द्वारा | १ |
| ६. | स्वयंमूल्यमापन | १ |

वरील सारणी क्रमांक ५.१८ वरून असे आढळून येते की, मूल्यांचे मूल्यमापन करण्याच्या प्रकारामध्ये ` निरीक्षण ` या प्रकाराचा वापर केला जावा असे २ अध्यापकांचे म्हणजेच १३.३३ टक्के अध्यापकांचे मत आहे.

निरीक्षण या साधनाचा वापर वर्ग, शालेय परिसर, क्रीडांगण अशा सर्व ठिकाणी करता येईल. मात्र निरीक्षण करतांना अध्यापकाने ते विशिष्ट गोष्टी डोळ्यापुढे ठेवून केलेले असावे. उदाहरणार्थ -` नियमितपणा ` हे मूल्य आजमावण्यासाठी वर्ग, वर्गातील अध्ययन, शालेय उपक्रम, गृहपाठ, सोपविलेली कामे अशा विविध प्रसंगातून ` नियमितपणा ` पाहाता येईल. शिक्षकांनी केलेले निरीक्षण हे वस्तुनिष्ठ आणि स्वत:चे मत व्यक्त न करता केलेले असावे. स्वढेच नव्हे तर विविध प्रसंगात मित्र, पालक, अन्य व्यक्तींनी केलेले निरीक्षणही ध्यानात घ्यावे लागेल.

मूल्यांचे मूल्यमापन ` चाचणीद्वारा ` केले जावे असा अभिप्राय २ अध्यापकांनी म्हणजेच १३.३३ टक्के अध्यापकांनी व्यक्त केला आहे. विद्यार्थ्यांची सद्य:स्थिती आजमावण्यासाठी ` चाचणी ` चा उपयोग होतो. विविध उपक्रमांतून मूल्ये रुजविण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्याच्या मताची पहाणी करून त्या उपक्रमात योग्य तो बदल करणे आवश्यक ठरते. उपक्रम राबविल्यानंतर चाचणीद्वारा विद्यार्थ्यांची मते आजमावून त्यातील वर्तन-परिवर्तन आजमावता येते.

निरीक्षण व चाचणीद्वारा या प्रकारानंतर मुलाखत, सृजनात्मक कार्य, प्रसंग निर्मितीद्वारा, स्वयंमूल्यमापन या साधनांचा क्रम लागतो.

प्रस्तुत प्रश्नाच्या शेवटच्या भागात प्रश्न क्रमांक २६ ला (विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होणाऱ्या मूल्यांचे मूल्यमापन करावे काय ? .... होय-नाही) ज्यांनी ` नाही ` असा प्रतिसाद दिला त्यांना अशाप्रकारचे मूल्यमापन का करू नये (उत्तर ` नाही ` असल्यास त्याची कारणे कोणती ?) याची विचारणा करण्यात आलेली होती.

या उपप्रश्नाला १० अध्यापकांनी म्हणजेच ६६.६६ टक्के अध्यापकांनी पुढीलप्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे :

१) मूल्याधारित प्रश्न विचारले जात नाहीत.परीक्षेच्या दृष्टीने मूल्यांना महत्त्व दिले जात नाही.

२) मूल्याधारित प्रश्न नसतो, परीक्षेच्या दृष्टीने मूल्यांना महत्त्व नसते.

३) मूल्यांचे मूल्यमापन करणे यशस्वी होईलच असे नाही. कदाचित काही काळानंतर प्रत्यक्ष व्यवहारी जीवनात मूल्ये उमटलेली दिसून येतील.

४) मूल्यमापनाची गरज नाही. त्यांचे व्यक्तिमत्व घडणे हेच महत्वाची कारण आपले मूल्यमापन होणार या भावनेने तो बेगडी वर्तनही करू शकेल व त्यामुळे ते मूल्यमापन अचूक ठरणार नाही. शिक्षणातून प्रत्यक्ष सुसंस्कारीत ` माणूस ` घडणे हेच महत्वाचे.

५) विद्यार्थ्यांच्या वागण्या बोलण्यामधूनच त्याच्यात मूल्यांचे संक्रमण झाले आहे किंवा नाही हे समजते त्यामुळे त्याचे वेगळे मूल्यमापन करण्याची जरूरी वाटत नाही.

६) विद्यार्थ्यांचे अंगी मूल्य रुजले, जोपासले गेले आहे हे प्रसंगोपात्त-रीतीनेच समजेल त्यासाठी कृत्रिम मार्ग अवलंबू नयेत. आलेल्या प्रसंगी विद्यार्थी कसा वागतो हे महत्वाचे, बेगडीपणा, कृत्रिमपणा असलेले वर्तन अपेक्षित नाही.

७) यशस्वीरीतीने मूल्यांचे मूल्यमापन करता येईल याची खात्री देता येत नाही शिवाय मूल्यसंस्कार ही विद्यार्थ्यांच्या संपूर्ण भावी जीवनाची शिदोरी आहे. केवळ परीक्षार्थी घडविण्यापेक्षा शिक्षणातून सुसंस्कारी ` माणूस ` घडणे महत्वाचे आहे.

८) विद्यार्थ्यात ` मूल्यसंक्रमण ` होणे महत्वाचे. ते संपूर्ण जीवनासाठी केवळ परीक्षेसाठी नव्हे म्हणून मूल्यमापन करू नये.

९) मूल्यमापन योग्य त्याप्रकारे करता येणे अशक्य आहे. कारण मूल्यसंक्रमण ही मानसिक प्रवृत्ती असते.

१०) मूल्यमापन योग्य त्या प्रकारे करता येणे अशक्य आहे. कारण मूल्यसंक्रमण ही मानसिक प्रवृत्ती आहे.

वरील अभिप्राय अध्यापकांच्या शब्दात असल्याने त्याची पुनरुक्ती जाणवते. ही पुनरुक्ती काढून मूल्यांचे मूल्यमापन का करू नये याचे वारंवारितेच्या स्वरूपात पुढील प्रमाणे वर्गीकरण करता येईल.

## सारणी क्रमांक ५.१९

### मूल्यांचे मूल्यमापन न करण्याची कारणे

| अनु. | मूल्यांचे मूल्यमापन न करण्याची कारणे | वारंवारिता |
|---|---|---|
| १) | मूल्यांचे मूल्यमापन यशस्वी होणार नाही. | ४ |
| २) | शिक्षणातून केवळ परीक्षार्थी घडविण्यापेक्षा ` माणूस ` घडणे महत्वाचे म्हणून मूल्यमापन करू नये. | २ |
| ३) | कृत्रिम वर्तन घडण्याची शक्यता. | २ |
| ४) | मूल्यांचे मूल्यमापन अव्यवहार्य. | २ |
| ५) | परीक्षेच्या दृष्टीने मूल्यांना महत्व दिले जात नाही. | २ |
| ६) | मूल्याधारित प्रश्न विचारले जात नाहीत. | २ |
| ७) | प्रत्यक्ष निरीक्षणातून ते घडत असल्यामुळे मूल्यांच्या मूल्यमापनाची गरज नाही. | १ |

वरील सारणी क्रमांक ५.१९ वरून असे निदर्शनास येते की, बहुतांशी अध्यापकांनी (६६.६६ टक्के)अध्यापकांनी) विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होणाऱ्या मूल्यांचे मूल्यमापन करू नये असा अभिप्राय दिला आहे. या ६६.६६ टक्के अध्यापकांनी विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होणाऱ्या मूल्यांचे मूल्यमापन करू नये याची पुढील कारणे दिली :

१) मूल्यांचे मूल्यमापन यशस्वी होणार नाही.

२) शिक्षणातून केवळ परीक्षार्थी घडविण्यापेक्षा ` माणूस ` घडणे महत्वाचे म्हणून मूल्यमापन करू नये.

३) कृत्रिम वर्तन घडण्याची शक्यता.

४) मूल्यांचे मूल्यमापन अव्यवहार्य.

याबाबत असे म्हणावेसे वाटते की -

१) संक्रमित झालेल्या मूल्यांचे मूल्यमापन पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी, समाजमिती, मुलाखत, निरीक्षण, या सारख्या साधनांच्या द्वारे यशस्वीरीतीने करता येईल.

२) शिक्षणातून केवळ परीक्षार्थी घडविण्यापेक्षा ` माणूस ` घडणे महत्वाचे म्हणून मूल्यांचे मूल्यमापन करू नये हे विधान विसंगत आहे.

३) कृत्रिम वर्तन घडण्याची शक्यता नाकारता येत नाही परंतु विद्यार्थ्यांच्या नकळत त्यांचे मूल्यमापन केले तर असे वर्तन घडण्याची शक्यता नाही.

४) मूल्यांचे मूल्यमापन करणे अवघड असले तरी अशक्य नाही आणि म्हणूनच मूल्यांचे मूल्यमापन करणे अव्यवहार्य आहे या मताशी सहमत होणे कठीण आहे.

सारणी क्रमांक ५.१९ (पृष्ठांक [illegible]) वरील ५ व ६ ही कारणे पटत नाहीत कारण आपल्याला शिक्षणातून केवळ परीक्षार्थी घडवावयाचा नाही. क्रमांक ७ चे कारणावरून असे स्पष्ट होते की, निरीक्षणातूनच ते घडते हेच आपण कबूल केल्यामुळे मूल्यांच्या मूल्यमापनाची गरज नाही हे पटत नाही.

## ५.१७ मूल्यांचे मूल्यमापन व नोंदी :

मूल्यांचे मूल्यमापन करताना त्याच्या नोंदी कशा ठेवता येतील हे जाणून घेण्याच्या हेतूने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २७ ची (मूल्यांचे मूल्यमापन करताना त्याच्या नोंदी कशाप्रकारे ठेवाव्यात ?) योजना केली होती. या प्रश्नाला ५ अध्यापकांनी म्हणजेच ३३.३३ टक्के अध्यापकांनी पुढीलप्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे.

१) विद्यार्थ्यांनी दैनंदिनीत ठेवलेल्या नोंदी शिक्षकाने मधून मधून त्या पाहून त्यावर सल्ला कराव्यात, आवश्यक वाटल्यास मौलिक सूचनाही कराव्यात. विद्यार्थ्यांची स्वत:ची दैनंदिनी हीच त्याने ठेवलेली नोंद महत्वाची.

२) श्रेणी देऊन नोंदी कराव्यात.

३) वर्तन-प्रवृत्ती-झालेले संस्कार-निवडलेला मार्ग या प्रमाणे नोंदी ठेवाव्यात.

४) वर्तन-परिवर्तनासाठी काही मूल्ये निश्चित करावीत झालेली मूल्ये निरीक्षणाने नोंद करावीत. उदा.

| | नाही | फारशी नाही | बरी आहे | चांगली आहे | भरपूर आहे |
|---|---|---|---|---|---|
| गुरुनिष्ठा | | | | | |
| जिज्ञासा | | | | | |

५) वेगवेगळ्या वर्गात प्रकल्प राबवून प्रत्येक मुलाची चाचणी घ्यावी व विद्यार्थ्यांमध्ये होणाऱ्या वर्तन परिवर्तनाची नोंद ठेवावी.

पडताळा सूची या साधनाचा मूल्यांचे मूल्यमापन करण्यासंबंधी पुढीलप्रमाणे उपयोग करता येईल :

या साधनामध्ये प्रत्येक मूल्याची सर्व अंगोपांगे, घटक-उपघटक यांचा सविस्तरपणे विचार होणे आगत्याचे आहे. प्रत्येक मूल्याच्या संदर्भात त्याचे पूर्ण विश्लेषण करून, सर्व उपांगांची, उपघटकांची विस्तृत अशी यादी तयार करण्यात आली पाहिजे. या यादीतील प्रत्येक उपांग किंवा उपघटक आढळतो-आढळत नाही एवढीच नोंद करावयाची आहे. पडताळा सूचीतील एकूण उपांगे किंवा उपघटकांपैकी महत्वाचे असे जास्तीत जास्त उपांग-उपघटक

आढळत असतील किंवा एकूण उपांगे-उपघटक जास्तीतजास्त उपांगे-उपघटक आढळत असतील तर ते मूल्य ब-याच प्रमाणात रूजले असा निष्कर्ष काढता येईल.

मूल्यांचे मूल्यमापनाची पडताळा सूचीच्या सहाय्याने पुढीलप्रमाणे नोंद ठेवता येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १) अभिवादन - | १. | आई, वडील, घरातील वडीलधा-या व्यक्तींना नमस्कार करतो. | ( ) |
| | २. | गुरूजनांना अभिवादन व मदत करतो. | ( ) |
| २) संबोधन - | ३. | आपल्यापेक्षा मोठया व्यक्तींशी बोलतांना आदरयुक्त संबोधनाचा वापर करतो. | ( ) |
| | ४. | पत्रलेखनात योग्य संबोधनांचा उपयोग करतो. | ( ) |
| | ५. | इतर व्यक्तींना हाक मारतांना योग्य व आदरयुक्त संबोधनांचा वापर करतो. | ( ) |
| ३) संभाषण - | ६. | इतरांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकतो. | ( ) |
| | ७. | स्वत:चे म्हणणे आग्रहाने पण नम्रतापूर्वक मांडतो. | ( ) |
| | ८. | मतभेदही संयमपूर्वक इतरांना न दुखविता व्यक्त करतो. | ( ) |
| ४) शिष्टाचार | ९. | आई, वडील, गुरूजन व इतर वडीलधा-या व्यक्ती यांच्या समोर बसणे, उठणे, येणे-जाणे इत्यादी कृती योग्यप्रकारे करतो. | ( ) |
| | १०. | एखादी कृती करतांना आवश्यक तेथे इतरांची परवानगी घेतो. | ( ) |
| | ११. | आपल्याकडून झालेल्या चुकीबद्दल त्वरीत दिलगिरी व्यक्त करतो. | ( ) |

वरील वर्तनबदल हे उदाहरणादाखल दिलेले आहेत. शिक्षकाने प्राप्त परिस्थितीत सोयीप्रमाणे स्वत:च्या वापरासाठी स्वतंत्र पडताळा सूची तयार करण्यास हरकत नाही.

५.१८ मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा :

मूल्यांचे मूल्यमापन आणि परीक्षा यांच्या संदर्भातील अध्यापकांची मते जाणून घेण्याच्या हेतूने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २८ च्या पूर्वभागाची (मूल्यांचे मूल्यमापन आणि परीक्षा यांचा संबंध जोडावा काय ? .... होय-नाही) योजना करण्यात आली होती.

प्रस्तुत प्रश्नाला दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ५.२० मध्ये वर्गीकरण केलेले आहे.

सारणी क्रमांक ५.२०

मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा यांचा संबंध जोडण्याबाबतचा अभिप्राय | ११ | ४ | १५ |

वरील सारणी क्रमांक ५.२० वरून असे निदर्शनास येते की, मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा यांचा संबंध जोडावा असा ११ अध्यापकांचा म्हणजेच ७३.३३ टक्के अध्यापकांचा अभिप्राय आहे. तर मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा यांचा संबंध जोडू नये असा ४ अध्यापकांचा म्हणजेच २६.६६ टक्के अध्यापकांचा अभिप्राय आहे.

प्रश्न क्रमांक २८ च्या पूर्वभागाचा ` होय ` असा अभिप्राय ज्यांनी दिला असेल त्यांना याच प्रश्नाच्या उत्तर भागात हा संबंध कसा जोडावा (मूल्यांचे मूल्यमापन आणि परीक्षा यांचा संबंध कसा जोडावा ?) याची विचारणा केली होती.

या उपप्रश्नाला ११ अध्यापकांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे :

१) परीक्षा पध्दतीवर भर न देता विद्यार्थ्यांमध्ये संस्कारित बदल झाला आहे का हे पहाणे गरजेचे, परीक्षेतील गैरप्रकाराला आळा घालणे महत्वाचे, प्रश्नपत्रिकेत मूल्यावर आधारित एखादा प्रश्न असावा.

२) परीक्षा पध्दतीला महत्व न देता विद्यार्थ्यांमध्ये संस्कारित बदल झाला आहे काय हे पहावे, परीक्षेतील गैरप्रकार टाळून विद्यार्थी परीक्षा देतील यात मूल्याधारित परिवर्तन झाले पाहिजे.

३) परीक्षेत असे काही प्रश्न असावेत की त्यातून विद्यार्थ्यांची मनोवृत्ती स्पष्ट व्हावी. त्या मनोवृत्तीतून त्याच्या मनावर कोणती मूल्ये ठसली आहेत याचा अंदाज लागेल.

४) परीक्षेत ` मूल्याधिष्ठित प्रश्न ` टाकून त्यावर विद्यार्थ्यांचे स्वत:चे मत विचारावे. त्यातून त्याची शिकविलेल्या पाठातील मूल्यांबाबतची बौध्दिक, भावनिक, वैचारिक बैठक काय झाली आहे हे तरी स्पष्ट होईल.

५) निबंधवजा प्रश्न परीक्षेत द्यावा. तो प्रश्न मूल्याधिष्ठित असावा. त्यावरून विद्यार्थ्यांला मूल्य पटले किंवा नाही ? त्या मूल्याचे जीवनातील महत्व वगैरे बाबींची पडताळणी करता येईल.

६) परीक्षेतील गुण व गुणात्मक नोंदी यावरून निर्णायक श्रेणी द्यावी.

७) या दृष्टीने विचार करता परीक्षेत एखादा प्रश्न देता येईल. तसेच वार्षिक परीक्षेतील काही गुण सहली, मुलाखती, श्रमदान शिबिरे, एन.एस.एस., एन.सी.सी., स्काऊट-गाईड, इत्यादी ठिकाणचे त्याच्या वर्तनाला राखून ठेऊन हा संबंध जोडता येईल.

८) संपूर्ण वर्षभरात घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमात विद्यार्थी कसा वागतो, कितपत भाग घेतो, कितपत कार्य करतो, समूहाशी त्याचे वर्तन इत्यादी वरून त्याची नोंद ठेऊन त्याला काही गुण वा श्रेणी द्यावी. व वार्षिक परीक्षेतील अंकात त्याचा समावेश व्हावा.

९) मूल्याधारित प्रश्न विचारून विद्यार्थ्यांची मते आजमावता येतील. निबंधवजा प्रश्नांतून एखादा पाठावरील प्रश्न विचारावा.

१०) राष्ट्रीय सेवा योजना, छात्रसेवा, स्काऊट, श्रमदान शिबिरे, वहातूक नियंत्रक प्रशिक्षण, सहली, मुलाखती, हस्तलिखिते, छायाचित्रे जमविणे वगैरे बाबींना अभ्यासक्रमात वाव असावा.

११) प्रश्न पत्रिकेचा आराखडा मूल्यावर आधारित ठेऊन.

वरील प्रतिसाद हा प्रतिसादकांच्याच शब्दांत असल्याने त्यात पुनरुक्ती जाणवते. ही पुनरुक्ती काढून मूल्यांचे मूल्यमापन आणि परीक्षा यांचा संबंध कसा जोडावा याचे वारंवारितेच्या स्वरूपात पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

सारणी क्रमांक ५.२१

मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा यांचा संबंध
जोडण्याचे प्रकार

| अनु. | मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा यांचा संबंध जोडण्याचे मार्ग | वारंवारिता |
| --- | --- | --- |
| १) | परीक्षेत निबंधवजा स्वरूपाचा मूल्याधिष्ठित प्रश्न विचारून. | ८ |
| २) | परीक्षेतील गुण व वर्णमरात घेतल्या जाणा-या उपक्रमांच्या गुणात्मक नोंदी यांचा संबंध जोडून | ४ |

वरील सारणी क्रमांक ५.२१ वरून असे दिसून येते की, मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा यांचा संबंध ' परीक्षेत निबंधवजा स्वरूपाचा मूल्याधिष्ठित प्रश्न विचारून ' जोडावा असा अभिप्राय ८ अध्यापकांनी म्हणजेच ६६.६६ टक्के अध्यापकांनी व प्रतिसाद दिलेल्या अध्यापकांच्या एकूण अध्यापक संख्येच्या ५३.३३ टक्के अध्यापकांनी व्यक्त केलेला आहे.

तर परीक्षेतील गुण व वर्णमरात घेतल्या जाणा-या उपक्रमांच्या गुणात्मक नोंदी यांचा संबंध जोडून ' मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा यांचा संबंध जोडावा असा अभिप्राय ४ अध्यापकांनी म्हणजेच ३३.३३ टक्के अध्यापकांनी व एकूण संख्येच्या २६.६६ टक्के अध्यापकांनी व्यक्त केला आहे.

परीक्षेत निबंधवजा स्वरूपाचा मूल्याधिष्ठित प्रश्न विचारून परीक्षा व मूल्यांचे मूल्यमापन यांचा संबंध जोडल्यास मूल्ये ज्ञानात्मक पातळीवर किती प्रमाणात रूजली याचेच मूल्यमापन होईल तथापि मूल्ये भावात्मक व क्रियात्मक पातळीवर किती प्रमाणात रूजली याचे मूल्यमापन करण्यासाठी वर्णमरात

घेतल्या गेलेल्या उपक्रमांच्या गुणात्मक नोंदी व परीक्षेतील गुण यांचा संबंध जोडूनच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचे विकसनाबाबत निर्णय घेता येईल.

५.१९ प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त असलेली अन्य माहिती :

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात विचारण्यात न आलेली तथापि प्रस्तुत संशोधनाला उपयुक्त ठरेल अशी आणखी काही माहिती अध्यापकांना द्यावयाची असल्यास त्यांना ती देण्याची संधी द्यावी यासाठी प्रश्नक्रमांक २९ ची (प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात वर विचारण्यात न आलेली तथापि प्रस्तुत संशोधनाला उपयुक्त ठरेल अशी आणखी काही माहिती द्यावयाची असल्यास ती कृपया खाली द्यावी) योजना करण्यात आली होती.

या प्रश्नाला १४ अध्यापकांनी पुढीलप्रमाणे प्रतिसाद दिला आहे :

१) गद्य, पद्य अध्यापनाच्या व निबंध कसे शिकवावेत याबाबत मूल्य शिक्षणाच्या संदर्भात हस्तपुस्तिका निघाव्यात.

२) मराठीच्या शिक्षकांसाठी मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चर्चासत्रे, कृतिसत्रे आयोजित केली जावीत.

३) मूल्यशिक्षणाच्या संदर्भात प्राथमिक, माध्यमिक स्तरावरही शोधनिबंधाचा अभ्यास व्हावा.

४) दृक्-श्राव्य शैक्षणिक साधने, आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे वगैरेंचा मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने परिणामकारकरीतीने काही उपयोग करून घेता येईल काय ? याबाबतही विचार करणे आवश्यकत्याचे वाटते. आज दूरदर्शनसारख्या माध्यमाने विद्यार्थ्यांच्या मनाची घेतलेली पकड पाहाता या साधनांच्याद्वारे ' मूल्यशिक्षणा ' बाबत विचार व्हावासा वाटतो.

५) मूल्यशिक्षणाच्या संदर्भात उपयुक्त ठरणाऱ्या अध्यापन पध्दतीबाबत प्रशिक्षण काळात (बी.एड्.) प्रशिक्षणार्थ्यांना विशेष माहिती मिळावी म्हणजे भावीकाळात ते त्या अध्यापन पध्दतींचा वापर आपल्या अध्यापनात करतील.

६) शिक्षक स्वत: मूल्ये जपणारा असावा. समाज, कुटुंब व्यवस्थेत मूल्यांना महत्त्व असावे. मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अगदी प्राथमिक शालेय स्तरापासून शोधनिबंधाचा अभ्यास व्हावा.

७) आजची शिक्षण पध्दती केवळ बौध्दिक विकासास हातभार लावणारी आहे. भावनिक व कार्यकौशल्यात्मक विकासाकडे अजिबात दुर्लक्ष होत आहे. ही परिस्थिती योग्य नाही. ती बदलण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या या तिन्ही पातळ्यांवर समाधानकारकरीतीने विकास होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जाणे आवश्यक वाटते.

८) मूल्यशिक्षणाच्या संदर्भात शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण मिळावे, नव्याने प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांच्या अभ्यासक्रमात मूल्याधिष्ठित अध्यापन कसे करावे ? याचे प्रशिक्षण मिळण्याची सोय व्हावी.

९) आपण निवडलेला विषय अतिशय महत्त्वाचा आहे. शिक्षणामध्ये शैक्षणिक मूल्यांना अधिक महत्व आहे. अध्यापकाने मूल्ये मुलांच्या मनात रुजविली तरच त्याचे अध्यापन यशस्वी झाले असे म्हणता येईल. विद्यार्थ्यांनी ती मूल्ये जर आत्मसात केली तर विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनात फार उपयोग होईल. यासाठी शिक्षकांनीसुध्दा मार्गदर्शन व्हावे व मूल्यांची जाणीव व्हावी म्हणून पुस्तिका तयार करणे आवश्यक आहे. कारण जर शिक्षकांनाच मूल्ये समजली नसतील तर ती विद्यार्थ्यांमध्ये उतरणार कशी ? या मूल्यांची जाणीव करून देणारे उद्बोधन वर्गसुध्दा घेणे महत्वाचे आहे.

१०) मूल्यशिक्षणाच्या संदर्भात प्राथमिक, माध्यमिक व उच्च-माध्यमिक शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण व्हावे.

११) प्रत्येक पाठातील मूल्यानुसार कोणते साहित्य वाचावे ? या विषयी मार्गदर्शन, चरित्रे-आत्मचरित्रे या विषयी मार्गदर्शन की ज्यामुळे पाठाधिष्ठित मूल्ये विद्यार्थ्यांपर्यन्त जाऊ शकतील, दृक्-श्राव्य साधनांचा उपयोग होण्याची शक्यता.

१२) प्रत्येक पाठातील मूल्यानुसार ललित साहित्य कोणते वाचावे ? या विषयी शिक्षकांकडून होणारे मार्गदर्शन, चरित्रे-आत्मचरित्रे याविषयी मार्गदर्शन की ज्यामुळे पाठाधिष्ठित मूल्ये विद्यार्थ्यांपर्यन्त जाऊ शकतील. दृक्-श्राव्य साहित्याचा उपयोग होण्याची शक्यता आजमावणे इत्यादीबाबत मार्गदर्शन व्हावे.

१३) शिक्षणक्रमात मूल्ये संक्रमित करण्याचा खास प्रयत्न होत नाही. त्यामुळे नव्या पिढीत विद्रोह, विफलता दिसून येते. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करण्यापेक्षा बौध्दिक विकास करण्यावर भर दिला जातो. शासन, समाज इत्यादी संस्था केवळ निकालाच्या वाढत्या टक्केवारीची अपेक्षा करतात. त्यामुळे शिक्षकांनाही तेच करावे लागते.

१४) विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये संक्रमित होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न अध्यापनाच्यावेळी झाले पाहिजेत. यासाठी शिक्षकाने व्यासंग ठेवला पाहिजे. कोणताही प्रयत्न अर्ध्यावरती सोडता कामा नये. केवळ परीक्षेच्या गुणांवर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन होता कामा नये. वर्षभरातील त्यांच्यामध्ये होणारे परिवर्तन डोळसपणे अभ्यासले पाहिजे.

वर केलेल्या सर्वच सूचना स्वागतार्ह वाटतात. सर्वसाधारण शिफारशी करताना त्यांची योग्य ती दखल घेतलेली आहे.

५.२० समारोप :

प्रस्तुत प्रकरणात उच्च माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठयपुस्तकांच्या अध्यापनाच्या मूल्यशिक्षणाच्या संदर्भात प्रश्नावली, मुलाखती आणि पाठ निरीक्षणाद्वारे उपलब्ध झालेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावण्यात आलेला आहे. पुढील प्रकरणात (प्रकरण सहावे) लावलेल्या अन्वयार्थांच्या आधारावर निष्कर्ष व शिफारशी केलेल्या आहेत.